**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**
**अर्थ प्रशासन विभाग**
**पी.ओ. कृषि नगर, अकोला -४४४ १०४ (महाराष्ट्र)**

जा.क्र.अप्रवि/अंलेप.कक्ष/ १७८२ /२०२३.                                    दिनांक: २९ /१२/२०२३

प्रति,

**नियंत्रण अधिकारी (सर्व) /**
**विभागप्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी (सर्व)**
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला / नागपूर

**विषयः** प्रलंबित लेखा आक्षेपांच्या पुर्ततेबाबत शिबिराचे आयोजन करणेबाबत.

**संदर्भ :** १) या कार्यालयाचे पत्र क्र.अप्रवि/अलेप/९३९/२०२३, दि. २१/०८/२०२३.
२) या कार्यालयाचे पत्र क्र.अप्रवि/अलेप/११३१/२०२३, दि.२०/०९/२०२३.
३) या कार्यालयाचे पत्र क्र.अप्रवि/अलेप/११३३/२०२३, दि.२०/०९/२०२३.

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.१ नुसार यापुर्वी लेखा आक्षेप पुर्तता तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरातील अनुपालने त्रृटीची पुर्तता करण्याकरीता परत करण्यात येऊन, पुनश्च सादर करण्याबाबत संदर्भीय पत्र क्र.२ व ३ अन्वये कळविण्यात आले असून, सदर त्रृटी पुर्तता करुन अनुपालने या कार्यालयास सादर करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे आपण सदर बाबीकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास येत असून याबाबत वरिष्ठांनी नाराजी व्यक्त केलेली आहे. याबाबीकडे सर्व कार्यालय प्रमुख, नियंत्रण अधिकारी, विभागप्रमुख यांचे वैयक्तीक लक्ष वेधण्यात येत आहे.

करीता वरील परिच्छेदांच्या अनुषंगाने आपणास परत कळविण्यात येते की, आपल्या कार्यालयाकडील त्रृटी पुर्तता करीता परत दिलेले आक्षेप अनुपालन व प्रलंबित असलेले लेखा आक्षेप परिच्छदांचे अनुपालन पडताळणी / तपासणी करण्याच्या दृष्टीने खालील दिलेल्या दिनांकास शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

तरी विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी, विभागप्रमुख व आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांना निर्देश देऊन जास्तीत जास्त प्रलंबित लेखा आक्षेप तपासणी करीता घेऊन उपस्थित रहाण्याबाबत आपल्या स्तरावरुन त्यांना सुचीत करावे. शिबिरात प्रलंबित लेखा आक्षेप तपासणी करण्यास्तव परिच्छेदाच्या अनुपालनासह आवश्यक त्या दस्ताऐवजच्या प्रती जोडून मुळ दस्तवऐवजसह उपस्थित रहावे व प्रलंबित लेखा आक्षेप परिच्छेद पडताळणी करुन घ्यावेत. जेणेकरुन आगामी लेखा आक्षेप पुर्ततः समितीत सदर प्रलंबित लेखा आक्षेप परिच्छेद निकाली काढण्यास्तव ठेवता येतील.

( कृपया मागे पहा......)

| अ.क्र | विभागाचे नाव | लेखा आक्षेप पडताणी शिबीर चे ठिकाण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | नागपूर विभाग | सहयोगी अधिष्ठाता, कृषि महा. नागपूर यांचे सभागृह | ०५/०१/२०२४ | सकाळी ११.०० वा. |
| २ | अकोला विभाग | अ.ले.प. कक्ष, नियंत्रक कार्यालय | ०९/०१/२०२४ | सकाळी ११.०० वा. |

स्वा/-
नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

प्रत : १) मा.कुलगुरु यांचे स्वीय सहायक, डॉ. पं. दे. कृ. वि, अकोला यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहितीस्तव.
२) मा. कुलसचिव, डॉ. पं. दे. कृ. वि, अकोला यांना माहितीस्तव.
३) मा. अधिष्ठाता (कृषि), डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना माहितीस्तव.
४) मा. संशोधन संचालक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना माहितीस्तव.
५) मा. संचालक विस्तार शिक्षण, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना माहितीस्तव.
६) मा.विद्यापीठ अभियंता, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना माहितीस्तव.
७) सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, नागपूर यांच्या माहितीस्तव.
८) वेतन व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला/ नागपूर.
९) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष,डॉ. पं. दे. कृ. वि, अकोला यांना विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसारणाकरीता.

करिता नियंत्रक

G:/ Audit cell/Letter Dept.112